MHKO100006132013

**आदेश निशाणी क्र. ७२**

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे कैफीयतीमध्ये दुरुस्ती होवून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, त्यांचे कैफीयतमधील कलम ११ मध्ये उपपरिच्छेद करून "वर नमूद अ.क्र.९००० दिनांक २१.११.१९९० चे मुळ मुत्युपत्र वर्दीसोबत गा. का. तलाठी, महागांव यांचेकडे आवश्यक तो फेरफार होणेकरीता दाखल करणेत आले होते. त्याप्रमाणे फेरफार नं. २०३२ चा दिनांक १४/०४/२००० इ. रोजी प्रमाणित झाला. त्यावर पुढे आर.टी.एस. अपिले दाखल झाली होती. तथापी आता चौकशी अंती समजून आले आहे की, त्या प्रकरणातील मुळ दिनांक २१/११/१९९० इ रोजीचे मृत्यूपत्र गहाळ झाले. या प्रतिवादींनी खूप शोधाशेध व पाठपुरावा करूनही ते त्यांना परत मिळाले नाही. म्हणून प्रतिवादींनी ते मुळ मुत्यूपत्र या कामी हजर करता आले नाही. तथापी सदर मृत्यूपत्राची सही-शिक्का नक्कल या कामी हजर करणेस व त्यावरून पुरावा करणेस या प्रतिवादींना परवानगी असावी" असा मजकूर समाविष्ट करण्यास परवानगी मागितली आहे. प्रस्तुत दुरूस्ती ही खुलासा स्वरूपाची असल्याने व ज्या मुळ मृत्यूपत्रावरून प्रतिवादी हक्क सांगतात त्याच्या कस्टडीबाबत कथन गरजेचे आहे. सुचविले दुरूस्तीमुळे दावेचे अगर कैफियतीचे मुळ स्वरूपात बदल होत नाही. प्रतिवादींना त्याबाबत पुढील योग्य तो पुरावा करण्यास संधी मिळणे आवश्यक आहे. सुचविलेली दुरूस्ती ही सद्भावनापुर्ण व न्यायिक आहे. सदर दुरुस्तीमुळे वादी यांचे

हक्कावर कोणतीही गदा येत नाही. सबब प्रतिवादी यांचा अर्ज मंजूर करणेची विनंती त्यांनी केली.

३. वादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे दाखल केले आहे. त्यांचे असे कथन आहे की, अर्जातील सर्व मजकूर चुकीचा व खोटा आहे. फेरफार क्र. २०३२ हा सन २००० म्हणजे दावा दाखल होण्यापुर्वीचा आहे. त्यावेळेस मृत्यूपत्राची अस्सल दिली हे न पटण्याजोगे आहे. दावेत वादीने सरतपासाचे ॲफिडेव्हीट फार वर्षापुर्वी दिले आहे. प्रतिवादीस मृत्यूपत्राची माहिती त्यावेळेस कैफियत दाखल करताना होती. १२ वर्षानंतर कैफियत दुरूस्ती मागणे कायदयास धरून नाही. प्रतिवादी due diligent नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा.

४. अर्ज व त्यावर वादी यांनी दाखल केलेले म्हणणे वाचले. उभयपक्षाच्या विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही बाजुच्या विधीज्ञांनी त्यांचे अर्जातील व म्हणण्यातील कथनाप्रमाणेच युक्तीवाद केला आहे.

५. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हक्कज्ञापनासाठी, वाटपासाठी व कायम मनाईसाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांनी दाखल केलेल्या निशाणी क्र. ३४ वरील कैफीयतीचे अवलोकन केले. त्यामध्ये परिच्छेद क्र. ११ मध्ये "प्रतिवादी क्र. ४ ते ८ यांना मयत धोंडीबा यांनी नोंदणीकृत मृत्यूपत्राने दिलेली धोंडीबा यांची स्वसंपादीत स्वतंत्र मिळकत प्रतिवादी नं. ४ ते ८ हेच केवळ मालक नात्याने धोंडीबा यांच्या मृत्यूनंतर आजअखेर कब्जेवहिवाट करून उपयोग घेत असताना खोटी विधाने करून मे. कोर्टाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करून हुकूम मिळवण्याच्या हेतूने खोटी विधाने केली आहेत. प्रतिवादी क्र. ४ ते ८ त्या सर्व विधानांचा स्पष्टतेने इन्कार करतात" असे नमूद आहे. वादीने दाव्यामध्ये प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचे नावचे रजि. अ.क्र.९००० दिनांक २१/११/१९९० चे

मृत्यूपत्र हे हक्क व अधिकार विरहीत बेकायदेशीर झालेने वादीचे हक्कावर बंधनकारक नाही असे हक्कज्ञापन होवून मागितले आहे. त्याबाबत वाद मुद्दा निश्चीत केला आहे.

६. प्रस्तुत अर्जाद्वारे मागितलेली दुरूस्ती ही खुलासा स्वरूपाची असल्याने व ज्या मुळ मृत्यूपत्रावरून प्रतिवादी हक्क सांगतात त्यांच्या कस्टडीबाबत कथन गरजेचे आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी मागणी केलेली ही दुरूस्ती ही मुळ दाव्याशी सुसंगत आहे. सद्य:स्थितीला ही दुरूस्ती मंजूर केली तर दाव्याचे स्वरूप बदलणार नाही व दाव्याचा अंतिम निर्णय करण्यासाठी मदत होणार आहे. परंतु प्रतिवादी यांनी सदर दुरूस्ती मागण्यास विलंब केला आहे. सदर अर्जामुळे दावा चालवण्यास विलंब होत आहे. म्हणून प्रतिवादी यांच्यावरती खर्च बसवून अर्ज मंजूर करणे योग्य होईल. त्यानुसार मी खालीलप्रमाणे आदेश करत आहे.

## आदेश

१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२) प्रतिवादी यांनी सदर अर्जाद्वारे मागितलेली दुरूस्ती मंजूर करण्यात येत आहे.

३) प्रतिवादी यांनी वादीस र.रू.१५००/- खर्च देवून १४ दिवसात कैफीयतीमध्ये दुरुस्ती करावी व दुरुस्त प्रत सत्वर दाखल करावी.

४) या अर्जाचा खर्च मुळ दाव्यात समाविष्ठ करण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by DHANASHRI MAHADEV PAWAR
Date: 2025.07.15 15:01:29 +0530

ठिकाण – गडहिंग्लज
दिनांक ११/०७/२०२५

डी. एम. पवार
दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर.
गडहिंग्लज